महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२१/तेवीस दिनांक : ३० मे, २०२४

## -: प्रसिद्धीपत्रक :-

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा- २०२१
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल
जाहिरात क्रमांक २४९/२०२१ व अधिसूचना क्रमांक ४९/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ९ जुलै, २०२२ (पेपर क्रमांक १) व दिनांक १७ जुलै, २०२२ (पेपर क्रमांक २) रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा - २०२१ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या अनाथ आरक्षणासंदर्भात मूळ अर्ज क्रमांक ३९६/२०२४ प्रकरणावरील मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजीच्या आदेशानुसार अनाथांची ०२ पदे प्रस्तुत निकालामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

२. प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या शिफारसपात्र काही उमेदवारांसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या असल्यामुळे शिफारसपात्र खेळाडू उमेदवारांची क्रीडा प्रमाणपत्र अहवालाची पुनर्पडताळणी करण्याच्या अटीच्या अधीन राहून खेळाडू उमदवारांचा निकाल राखून ठेवून उर्वरित ३५८ पदांचा निकाल दिनांक ३० मे, २०२४ रोजी जाहीर करण्यात येत आहे. खेळाडू उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

३. प्रस्तुत परीक्षेच्या जाहीर केलेल्या निकालानुसार पुणे जिल्हयातील कळसकर अजय बाळासाहेब, बैठक क्रमांक PN008177 हे राज्यातून तसेच मागासवर्गातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून पुणे जिल्हयातील सावंत मयुरी महादेव, बैठक क्रमांक PN001279 ह्या राज्यात प्रथम आल्या आहेत.

४. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

५. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठयर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

७. खेळाडू उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व उमेदवारांना त्यांच्या गुणपत्रिकेतील गुणांची पडताळणी करण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई